**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

पोलीस निरीक्षक
अमळनेर पोलीस स्टेशन

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** अमळनेर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0212 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**29/04/2026 00:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 28/04/2026

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिंनाक पर्यंत):** 28/04/2026

**Time From (वेळेपासून):** 10:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 29/04/2026 **Time (वेळ):** 00:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 29/04/2026 00:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अमळनेर शहरातील तहसिल, कार्यालय आवारासमोर श्री,महालक्ष्मी स्विट या दुकानात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पद्मावती कलाल पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे,अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे,अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788986178

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामराव हरचंद पाटील | | | 1. रालोणपंचम ताअमळनेर, अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | जितेंद्र राजेंद्र पाटील | | | 1. रामुझाडी पोशिरसाळे ताअमळने, अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी पद्मावती मधुसुदन कलाल, वय 42 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे आठ महिन्यापासुन कार्यरत आहे. दि.27.04.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार समाधान भास्कर पाटील यांची खाजगी इसम रामराव पाटील व जितेंद्र पाटील हे अमळनेर तहसिलदार यांच्या नावाने त्यांच्याकडे लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हास आदेशित केल्याने आम्ही मा. कार्यकारी अभियंता (उत्तर), सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील श्री रामेश्वर नाना संपाल, कनिष्ठ लिपीक व श्री सक्षम पंकज खरे, शिपाई यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार समाधान भास्कर पाटील, त्यांचे सोबत असलेले त्यांचे मित्र योगेश हिलाल कोळी, पोलीस निरीक्षक यशवंत बोरसे व पोकॉ. मकरंद पाटील यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव समाधान भास्कर पाटील, वय. 42 वर्ष, व्यवसाय. शेती/ गौणखनिज वाहतुक, रा. मांडळ, ता. अमळनेर, जि. जळगांव असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार टंकलिखित करुन घेण्यात आली ती ''मी भाडे तत्वावर ट्रॅक्टर घेवुन गौण खनिज वाहतुकीचा व्यवसाय करतो. मी तोंडी भाडे तत्वावर घेतलेले एक ट्रॅक्टर गौण खनिज वाहतुक करतांना मार्च 2025 मध्ये अमळनेर तहसिल कार्यालयातील महसुल विभागाच्या पथकाने पकडुन तहसिल कार्यालय अमळनेर येथे जमा केले आहे.

त्यानंतर मी 02 ट्रॅक्टर तोंडी भाडे तत्वावर घेवुन मौजे मांडळ येथील पांझरा नदीतुन वाळुची वाहतुक करीत असतांना रामराव हरचंद पाटील व जितेंद्र राजेंद्र पाटील यांनी मला अमळनेर - ढेकु रस्त्यावर 2/3 दिवसापुर्वी भेटुन त्यांनी ''आम्ही तहसिलदार साहेबांचे माणसं आहोत, तुम्ही बेकायदेशीर वाळुची वाहतुक करतात, तुम्हाला तहसिलदार साहेबांना 25,000/- रुपये प्रमाणे दोन ट्रॅक्टरचे 50,000/- रुपये दरमहा हप्ता आमच्याकडे द्यावा लागेल, नाहीतर तुमच्यावर अवैध गौण वाहतुकीचा गुन्हा दाखल करतील'' असे सांगितले आहे. तेव्हा मी त्यांना माझी तहसिलदार साहेबांशी भेट करुन द्या असे सांगितले आहे. अशी लाच मागणी केल्याची तक्रार दिली. सदर तक्रार वाचुन तक्रारी अर्जावर ◌आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांशी चर्चा करुन अमळनेर येथे जावुन तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही, पोलीस निरीक्षक बोरसे, दोन्ही पंच, पोकॉ. मकरंद पाटील असे खाजगी कार क्रमांक एम.एच.15 केजी 5114 ने तसेच तक्रारदार व त्यांचा मित्र योगेश कोळी असे तक्रारदार यांच्याकडील मोटार सायकल क्र. एम.एच.54 ए 2375 ने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन अमळनेर शहरातील धुळे - अमळनेर रस्त्यावरील अमळनेर शहराच्या कमानीजवळ पोहोचलो.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेशी चर्चा करुन त्यांना मोबाईलवरुन खाजगी इसम रामराव पाटील यांना फोन करुन कोठे येवु? बाबत विचारणा करण्यास सांगितले, तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे सोबत असलेले त्यांचे मित्र योगेश कोळी यांना त्यांच्या मोबाईलवरुन जितेंद्र पाटील यांना कॉल करण्यास सांगितले, परंतु योगेश कोळी यांनी बराच वेळ प्रयत्न करुनही जितेंद्र पाटील यांचा फोन स्विचऑफ असल्याने त्यांचेशी संपर्क झाला नाही. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेशी चर्चा करुन पडताळणी कार्यवाही स्थगित करुन आम्ही तक्रारदार यांना दि.28.04.2026 रोजी सदर ठिकाणीच भेटण्यास सांगितले. तसा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन सविस्तर पंचनामा केला.

त्यानंतर दि.28.04.2026 रोजी आम्ही, पोलीस निरीक्षक बोरसे, दोन्ही पंच, पोकॉ. मकरंद पाटील असे खाजगी कार क्रमांक एम.एच.15 केजी 5114 ने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन अमळनेर शहरातील धुळे -

अमळनेर रस्त्यावरील अमळनेर शहराच्या कमानीजवळ पोहोचलो. तेथे ठरल्याप्रमाणे तक्रारदार व त्यांचे मित्र योगेश कोळी हे त्यांच्या दुचाकीसह आम्हास भेटले. तेव्हा तक्रारदार यांनी रामराव पाटील व जितेंद्र पाटील हे तहसिल कार्यालयाजवळ भेटतील असे आम्हास सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्याकडे देवुन तक्रारदार, त्यांचे मित्र योगेश कोळी व पंच नं. 01 संपाल अशांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलने रामराव पाटील व जितेंद्र पाटील यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालयात रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार, त्यांचा मित्र योगेश कोळी व पंच नं. 01 संपाल असे आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. 01 संपाल यांना विचारणा केली असता त्यांनी ते, तक्रारदार व तक्रारदार यांचे मित्र योगेश कोळी यांनी तहसिल कार्यालयाचे आवारात जावुन रामराव पाटील व जितेंद्र पाटील यांची भेट घेतली, तेव्हा ते आम्हास चहाचे दुकानावर घेवुन गेले. तेथे त्यांनी तक्रारदार यांचेशी वाळु वाहतुकीबाबत चर्चा केली. चर्चेदरम्यान रामराव पाटील व जितेंद्र पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे 02 ट्रॅक्टर चालु देण्यासाठी 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन एका ट्रॅक्टरचे 25,000/- रुपये आजच देण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण तहसिलदार यांच्या कक्षाजवळ आलो. तेथे खाजगी इसम जितेंद्र पाटील यांनी केलेल्या इशाऱ्यावरुन तक्रारदार यांनी मला कक्षाबाहेर थांबण्यास सांगुन तक्रारदार, रामराव पाटील व जितेंद्र पाटील असे तहसिलदार यांच्या कक्षात गेले. तेव्हा तक्रारदार हे लगेच कक्षाच्या बाहेर आले, त्यानंतर तक्रारदार हे पुन्हा कक्षात गेले. त्यानंतर काही वेळाने ते सर्वजण बाहेर आल्याची हकिगत कथन केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी पंच नं. 01 यांच्या प्रमाणे हकिगत सांगुन तहसिलदार साहेबांनी माझे यापुर्वी जमा असलेल्या ट्रॅक्टरच्या दंडात्मक कारवाई बाबत चर्चा केली. त्यांनी माझो दोन ट्रॅक्टरच्या वाहतुकीबाबत माझ्याशी काहीएक चर्चा केली नाही. त्यानंतर मी कक्षाबाहेर आलो. अशी हकिगत सांगितली. सदरची हकिगत व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ए◌ेकुन आमची व पंचांची रामराव पाटील व जितेंद्र पाटील यांनी लाचेची मागणी केल्याची खात्री झाली. त्यानंतर आम्ही रामराव पाटील व जितेंद्र पाटील यांचेवर सापळा लावण्याचा निणय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 25,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 50 नोटा काढुन सदर चलनीय नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. दरम्यान तक्रारदार यांचे मित्र योगेश कोळी यांचे मोबाईलवर रामराव पाटील यांचा फोन येवुन त्यांनी लवकर येणेबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार, त्यांचा मित्र यो◌ेगेश कोळी व पंच नं. 01 रामेश्वर संपाल अशांना तक्रारदार यांच्याकडील दुचाकीने तहसिल कार्यालयाजवळ रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे, पंच नं. 2 सक्षम खरे, पोहेकॉ. संतोष पावरा, पोकॉ. प्रविण पाटील, पोकॉ. मकरंद पाटील यांचेसह खाजगी वाहन क्रमांक एम.एच.15 केजी 5114 तसेच पडताळणी कार्यवाहीनंतर बोलविण्यात आलेले शासकिय वाहन क्रमांक एम.एच.18 बीएक्स 0221 ने जावुन तहसिल कार्यालयासमोरील परिसरात वाहन थांबवुन आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी श्री महालक्ष्मी स्विट या दुकानाबाहेर येवुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा पंच नं. 1 यांनी समोरच उभे असलेल्या जितेंद्र पाटील यांच्याकडे इशारा करुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवल्याची हकिगत सांगितली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी जितेंद्र पाटील यांना त्यांचे मनगटापासुन हात धरुन त्यांना अटकावुन ठेवले. तसेच पोकॉ. प्रविण पाटील यांनी रामराव पाटील यांना ताब्यात घेतले. तेव्हा जितेंद्र राजेंद्र पाटील यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात जावुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे खाजगी इसम रामराव हरचंद पाटील, रा.लोणपंचम, ता. अमळनेर, जि. जळगांव व खाजगी इमस जितेंद्र राजेंद्र पाटील, रा. मु. झाडी, पो. शिरसाळे, ता. अमळनेर, जि. जळगांव यांनी तहसिलदार अमळनेर यांच्या नावाचा प्रभाव पाडुन तक्रारदार समाधान भास्कर पाटील यांचेकडे त्यांचे 02 ट्रॅक्टरने वाळु वाहतुक करु देण्यासाठी प्रती ट◌ॅ्रॅक्टर 25,000/- रुपये असे एकुण 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन सापळा कारवाई दरम्यान जितेंद्र राजेंद्र पाटील यांनी तक्रारदार यांचेकडुन एक ट्रॅक्टरचे 25,000/- रुपये लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्विकारताना त्यांना 15:16 वाजता रंगेहात पकडण्यात आले असुन नमुद दोन्ही आरोपीतांविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7- अ प्रमाणे माझी कायदेशिर फियाद आहे. वगैरे मजकुरच्या फिया◌्दीवरुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठाचे आदेने पा◌ेनि यशवंत बा◌ेरसे यांच्याकडे देण्यात आला आहे -

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Dattatray Yuvraj Nikam(I (Inspector)) / CPF150110094474091 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Dattatray Yuvraj Nik
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): CPF150110094474091